“ कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही. ”



# करुणामूर्ती माता रमाई

*भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा 9 वर्षांची व भीमराव 14 वर्षांचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पद्धतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते. तेव्हा रमाच्या कोवळ्या मनावर आघात झाला. परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला.*

सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंगत नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दुःखाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बान्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी-थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. 1913 साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, 1914 ते 1917 दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. 1921 ला डॉ.बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व 1926 मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या डॉ. बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या. घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. 1923 साली डॉ.बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. डॉ. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला. पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई! डॉ. बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक डॉ. बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे? म्हणून डॉ. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाडमध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, 'दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही'. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही.



प्रविण बागडे
मो. 9923620919

ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. त्यामुळे ती खेळायला बाहेर आली नाहीत. ते रमाईला कंठ दाटून सांगत असतांना, रमाई लगेच आपल्या खोलीमध्ये गेल्या आणि रडत बसल्या त्यांनाही ते दुःख सोसावेना. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे दिल्या. वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान



मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात, लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण झाल्यावर. खूप आनंदी असतात. हे पाहून रमाई देखील आनंदी झाल्या. त्या क्षणापासून रमाबाई ही माता रमाई झाली आणि ती सगळ्यांची आई झाली. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज व त्यांना मानणारा चाहता वर्ग मुंबई बंदरात आला. साहेबांचे स्वागत बघण्यासाठी माईला सुद्धा जायचे होते. परंतू, नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती. तेव्हा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून डॉ. बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच जनासागर उफाळून आला, त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त्यांना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी दिसताच, डॉ. बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामूवर गेली, ते जवळ गेले. त्यांनी विचारले, 'रामू! तू लांब का उभी राहीलीस'? रमाई म्हणाली, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतूर झाला असतांना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नव्हते, म्हणून तर मी अशी लांब उभी आहे. शेवटी, मी तर तूमची पत्नीच आहे. मी तुम्हांस कधीही भेटू शकते.

रमाईनी अठ्ठावीस वर्षे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास बसून राहायच्या. डॉ. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावार त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत, 'साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा.' असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्याचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवहीत टिपण्यास सांगत, इतकी ती त्यांना जोपासत होती. हळवे मन मितभाषी अत्यंत स्वाभिमानी अशा रमाई होत्या. साहेबांसाठी जिवाचे रान करणारी रमाई त्यांना कसलीही इजा होणार नाही यासाठी धडपडणारी रमाई! रमाईचे शरीर काबाड कष्टाने पोखरून खंगुन गेले होते, रमाईचा आजार बळावला होता. डॉ. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. डॉ.बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असत. त्यांचा आजार काही केल्या बरा होत नव्हता. बाबासाहेबांना दुःख अनावर होत होते. अस्वस्थपणा जाणवत होता, ते काहीच बोलू शकत नव्हते, निमूटपणे रमाईकडे बघत होते. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंताबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. 27 मे 1935 रोजी सकाळी 9 वाजता रमाईची प्राण ज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. कोट्यवधी रंजल्या गांजल्याची रमाई माता त्यांना अंतरली होती. दुपारी 2 वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली. आम्हा दुरावली मायेची सावली. निर्वाण पावली आमची रमाई माऊली. पहाडासारखे बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले.

'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा आपला ग्रंथ डॉ. बाबासाहेबांनी आपल्या 'प्रिय रामू' ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत डॉ. बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ''तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली- जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणींत कोरलेले हे प्रतीक...'' आपल्या पत्नीबद्दलच्या भावना डॉ. बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत. करुणामूर्ती माता रमाईच्या 127 व्या जयंती निमीत्त विनम्र अभिवादन! ■ ■

## गुरुकुल

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

एक आदर्श गुरूकुल म्हणून त्या संस्थेचा सर्वदूर लौकिक होता. सुसंस्कारीत विद्यार्थी घडवण्याचे व्रतच तेथील निःस्वार्थी अन् सेवाभावी शिक्षकांनी अंगिकारले होते. तेथून शिकून बाहेर पडणारे शेकडोजण मोठमोठ्या पदांवर होते. समाजही त्यांचेंकडे चांगल्या नजरेने बघायचा. पण म्हणतात ना, नियमालाही काही अपवाद असतातच, त्याच गुरूकुलातील एका विद्यार्थ्याने गुन्हेगारी क्षेत्रात कुप्रसिद्धी मिळवली होती, खंडणी, खून, बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांत त्याचा सहभाग होता. एका खटल्यात त्याला शिक्षा झाल्याची बातमी सर्व समाजमाध्यमांवर झळकत होती. ते बघून एक व्यक्ती गुरूकुलाच्या आचार्यांना म्हणाली, 'हा तुमच्या गुरुकुलाचा विद्यार्थी. इतर विद्यार्थी किती गुणवान पण हा असा कसा निघाला?' त्यावर आचार्य म्हणाले, 'शिक्षणापेक्षाही स्वतःची समजदारी ही आयुष्यात फार महत्त्वाची असते. कोणी काय बोध घ्यावा, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. अशी बरीच उदाहरणे समाजात आहेत उदाहरणच द्यायचे झाले तर अर्जुन आणि दुर्योधनाचे एकच गुरू होते. पण दोघांमध्ये किती फरक होता?' पावसाच्या सरी सर्वांना एक सारखेच पाणी देतात, पण कुठे गोड उस अंकुरीत होतो तर कुठे कडूलिंब फोफावतो. सूर्याचही तसेच आहे. तो सर्वांनाच सारखा प्रकाश देतो पण, एखादी ज्ञानी व्यक्ती त्या प्रकाशात अध्ययन करते. तर चोरटे त्याच प्रकाशात चोरलेल्या पैशांची हिस्सेवाटी करतात. ज्या व्यक्ती चांगले विचार अन् संस्कार आत्मसात करतात, त्यांना एखादेवेळी त्रास जरी सहन करावा लागला तरी, तो तिरस्काराचा धनी होत नाही. अन्नाचा दुष्काळ पडला तर माणूस मरतो, पण संस्काराचा दुष्काळ पडला तर माणुसकी मरते. संस्कारों से बड़ी कोई वसीयत नहीं और इमानदारी से बडी, कोई विरासत नही. ■ ■

# स्वामी विवेकानंदांचे धर्मांतरांबद्दलचे विचार



डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

स्वामी विवेकानंद हे पहिले दार्शनिक आहेत, ज्यांनी ठामपणे सांगितलह्यय, 'या देशातली धर्मांतरं ख्रिश्चन आणि मुसलमान यांनी केलेल्या अत्याचारामुळे नव्हेत, तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारामुळे झालीत.' विवेकानंदांची दोन पत्र अतिशय महत्त्वाची आहेत, ती पहा. एक 20 सप्टेंबर 1892 चे आहे, जे सर्वधर्म परिषदेच्या एक वर्ष आधी आणि दुसरे नोव्हेंबर 1894 चे आहे, जे सर्वधर्म परिषदेच्या एक वर्षांनंतरचे आहे. 20 सप्टेंबर 1894 चे पत्र त्यांनी खेत्री निवासी शंकरलाल शर्मा यांना लिहिलेय. त्यात विवेकानंद म्हणतात, 'मी त्रावणकोर - कोचीन प्रांतात आहे आणि या त्रावणकोर कोचीन प्रांतात पुरोहितांचा अत्याचार भारतात सर्वाधिक आहे आणि त्यामुळे त्रावणकोर - कोचीन प्रांतातली एक तृतीयांश जनता ख्रिश्चन झाली, तर आपण कोणाला दोष देणार आहोत? प्रचंड संपत्ती पुरोहितांच्या नावावर आहे. सर्व मंदिरे त्यांच्या नावावर आहेत आणि राजघराण्यातील स्त्रियाही त्यांच्या उपपत्नी होऊन राहण्यात आनंद मानताहेत' आणि पुढचे जे पत्र आहे, ते अधिक महत्त्वाचे आहे. त्यांनी जे लिहिलेय, नोव्हेंबर 1894 ला हरिदास बिहारीलाल देसाई यांना. त्या पत्रावर तारीख नाही आहे. पण ते नोव्हेंबरच्या सुरुवातीचे आहे. विवेकानंद बंगालबद्दल लिहिताहेत. विवेकानंद म्हणतात, 'माझ्या बंगालमध्ये एवढे हिंदू मुसलमान का झाले?' हे शब्द विवेकानंदांचे आहेत, 'धर्मांतर तलवारीच्या जोरावर झाली असे मानणे हे महामूर्खपणाचेच आहे.' संबंध शब्द त्यांचा आहे. ते म्हणतात, 'ज्यांनी धर्मांतर केली. ती हिंदू जमीनदारांच्या आणि पुरोहितांच्या अत्याचारातून मुक्त होण्यासाठी, स्वाधीनतेसाठी आणि सन्मानासाठी हे आपण ओळखले पाहिजे.' विवेकानंद जे सांगतात ते रामदास समजले. रामदास दासबोधात म्हणतात,

*'कित्येक दावल मलकास जाती । कित्येक पीरासच पूजती । कित्येक तुर्क होती आपुल्या इच्छेने ॥ '* पण ही इच्छा उच्च वर्णीयांच्या अत्याचारामुळे होते हे सांगत विवेकानंद उभे आहेत. ■ ■

# देव, दैव आणि दुर्दैव

**'काश्मीरमध्ये बिगर मुस्लिम येऊ नये यासाठीच काही जणांनी धर्म विचारून गोळ्या घातल्या मात्र याला मी दुर्दैवी मानतो.' तसेही माननीय प्रकाश आंबेडकर साहेबांच्या आणि काही आंबेडकरी नेत्याच्या भाषणात आणि वक्तव्यात बऱ्याचदा दुर्दैव हा शब्द येत असतो त्यावरून मला थोडेसे लिहावेसे वाटले म्हणून हा लिहिण्याचा प्रपंच.**



प्रमोद मून
मो.94230 63127

देव, दैव आणि दुर्दैव हे शब्द ब्राह्मणी संस्कृती/धर्म मजबूत करण्याकरता खूप कारणीभूत आहेत.

**1. आध्यात्मिक संबंध** – देव, दैव आणि दुर्दैव या संकल्पना खोट्या आहेत पण हिंदू मानवाच्या जीवनात आध्यात्मिक आणि दैवी शक्तींशी संबंधित आहेत. देव हे ईश्वरी शक्तीचे प्रतीक आहे, तर दैव आणि दुर्दैव हे नशिबाशी किंवा पूर्व जन्माच्या प्राक्तनाशी संबंधित आहे आहे.

**2. अदृश्य शक्ती** – देव, दैव आणि दुर्दैव संकल्पना अदृश्य शक्तींवर आधारित आहेत. देव हा पूजनीय आणि विश्वाचा नियंता मानला जातो, तर दैव आणि दुर्दैव हे मानवाच्या प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या घटनांचे पूर्वनियोजित ठरलेले वेळापत्रक मानले जाते.

**3. मानवी विश्वास** – तिन्ही संकल्पनांवर हिंदू आणि इतर लोकांचा विश्वास आहे. आंबेडकरी समाजाचा या संकल्पनांवर विश्वास नाही. आंबेडकरी समाजाव्यतिरिक्त इतर लोक देवांवर श्रद्धा ठेवून पूजा करतात, तर दैवावर विश्वास ठेवून लोक आपले भविष्य समजण्याचा प्रयत्न करतात आणि जिवनात एखादी वाईट घटना घडली तर ते दुर्दैव आहे म्हणून कारणाचा शोध न घेता स्वतःचे समाधान करतात.

**4. जीवनावर प्रभाव** – देव, दैव आणि दुर्दैव या तिन्ही संकल्पना मानवी जीवनावर प्रभाव टाकतात.




देवाकडून आशीर्वाद मिळवण्यासाठी प्रार्थना केली जाते, तर दैव हे जीवनातील सुख-दुःख ठरवते तर दुर्दैव आपल्या वाईटाला कारणीभूत आहे असे मानले जाते.

**5. सांस्कृतिक महत्त्व** – वैदीक संस्कृतीत देव, दैव आणि दुर्दैव तिन्ही संकल्पनांना फार महत्त्व आहे. देव पूजेचा केंद्रबिंदू आहे, तर दैव ज्योतिष, कर्म आणि भाग्य यांच्याशी जोडलेले आहे तर दुर्दैवाच्या संकल्पनेमुळे गरीब आणि अपयशी माणूस खीतपत पडलेल्या गरिबीला व त्याच्या अपयशाला आपले दुर्दैव समजून त्यातून वर येण्याचा प्रयत्न करीत नाही. देव, दैव आणि दुर्दैव हे माणसाला जिवनात निष्क्रिय बनवते.

**सारांश** –

देव, दैव आणि दुर्दैव तिन्ही संकल्पना मानवाच्या जीवनात दैवी शक्ती, विश्वास आणि नशिबाशी संबंधित आहेत, भारताच्या अधोगतीला आणि गरिबीला पुष्कळ अंशी ह्या संकल्पना कारणीभूत आहेत.

या तिन्ही संकल्पना तथागत गौतम बुद्धांनी त्यांच्या तत्त्वज्ञानात नाकारल्या आहेत, ज्या लोकांनी 1956 ला बौद्धधम्म स्वीकारला ते लोक मनापासून या देव, दैव आणि दुर्दैव संकल्पना नाकारत आहेत.

असे असतांना काही आंबेडकरी समाजाच्या नेत्यांच्या वक्तव्यात सतत दुर्दैव हा शब्द येतो, ते म्हणतात की
हे दुर्दैवाने घडलेले आहे,
हे दुर्दैव आहे,
याला मी दुर्दैव मानतो.

आंबेडकरी नेत्यांनी देव, दैव आणि दुर्दैव हे शब्द त्यांच्या वक्तव्यात आणि लेखात सकारात्मक अर्थाने वापरणे हे बुद्ध तत्त्वज्ञानाच्या विरोधात आहेत. तरीपण काही नेते हे शब्द वापरतात ते कितपत योग्य आहे हे आंबेडकरी जनतेने ठरवावे. ■ ■

# प्रदूषण थांबवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय

## सर्वोच्च न्यायालयाने पूर्वलक्षी हरित मंजुरी रद्द केली!



गेल्या काही वर्षांपासून पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. विकासाच्या नावाखाली अनेकदा पर्यावरणाची हानी केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. अशातच, सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय दिला आहे. केंद्र सरकारने जारी केलेला 'पूर्वलक्षी हरित मंजुरी' (Retrospective Environmental Clearance) देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. या निर्णयामुळे पर्यावरणाची काळजी घेणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी हा एक मैलाचा दगड ठरणार आहे.

**काय होती ही 'पूर्वलक्षी हरित मंजुरी'?** सोप्या भाषेत सांगायचह्य तर, 'पूर्वलक्षी हरित मंजुरी' म्हणजे एखाद्या प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर, किंवा काम पूर्ण झाल्यानंतरही त्याला पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) देणे. 'पर्यावरण परिणाम मूल्यांकन अधिसूचना, 2006' नुसार, कोणत्याही प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वीच त्यासाठी आवश्यक असलेली पर्यावरणीय मंजुरी घेणे बंधनकारक आहे. या मंजुरीशिवाय काम सुरू करणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन करणे. मात्र, केंद्र सरकारने 2017 मध्ये एक अधिसूचना आणि 2021 मध्ये एक कार्यालयीन ज्ञापन (Office Memorandum) जारी केले होते, ज्यामुळे प्रकल्पांचे काम सुरू झाल्यानंतरही त्यांना ही मंजुरी मिळवणे शक्य झाले होते. यालाच 'पूर्वलक्षी हरित मंजुरी' असे म्हटले जात होते. सरकारचे म्हणणे होते की, यामुळे अर्थव्यवस्थेला हातभार लावणाऱ्या उद्योगांना आणि प्रकल्पांना दंडित करण्याऐवजी त्यांना नियमित करता येईल.

**सर्वोच्च न्यायालयाने का रद्द केला हा आदेश?**

सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश रद्द करताना अनेक महत्त्वाच्या बाबींवर बोट ठेवले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, 'पूर्वलक्षी हरित मंजुरी' देणे हे पर्यावरण कायद्यांच्या आणि संविधानातील तरतुदींच्या विरोधात आहे. याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :

**पर्यावरणाच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन :** संविधानाच्या कलम 21 नुसार, प्रत्येक नागरिकाला स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त वातावरणात जगण्याचा हक्क आहे. 'पूर्वलक्षी हरित मंजुरी'मुळे हे हक्क पायदळी तुडवले जात होते. प्रदूषण झाल्यावर किंवा पर्यावरणाची हानी झाल्यावर मंजुरी देणे म्हणजे पर्यावरणाच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. प्रदूषणकर्त्यांना संरक्षण ज्या कंपन्यांनी किंवा विकासकांनी आधीच पर्यावरणीय मंजुरी न घेता काम सुरू केले, त्यांनी एक प्रकारे कायद्याचे उल्लंघन केले होते. त्यांना नंतर मंजुरी देऊन संरक्षण देणे म्हणजे चुकीला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. न्यायालयाने याला 'अवैध कृत्यांना प्रोत्साहन' असे संबोधले आहे. 'पर्यावरण परिणाम मूल्यांकन' (EIA) प्रक्रियेला तडा : कोणत्याही प्रकल्पाचे पर्यावरणावर काय परिणाम होतील, याचे मूल्यांकन करण्यासाठी 'पर्यावरण परिणाम मूल्यांकन' (EIA) ही एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यापूर्वीच पूर्ण होणे आवश्यक असते. पूर्वलक्षी मंजुरीमुळे या प्रक्रियेचा मूळ उद्देशच संपून जात होता.



दर्शन तळहांडे
मो. 9730030114

**विकास पर्यावरणाच्या किंमतीवर नको :** न्यायालयाने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, 'किंमतीवर विकास होऊ शकत नाही.' शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा हा अविभाज्य भाग आहे.

**यापूर्वीच्या निर्णयांचा संदर्भ :** सर्वोच्च न्यायालयाने केवळ या प्रकरणातच नव्हे, तर यापूर्वीही अनेकदा 'पूर्वलक्षी पर्यावरणीय मंजुरी'ची संकल्पना पर्यावरण कायद्यांना परकी असल्याचे म्हटले आहे. अशा प्रकारच्या मंजुरींना न्यायालयाने वेळोवेळी विरोध केला आहे. उदाहरणार्थ, Lafarge Umiam Mining Private Limited विरुद्ध Union of India (2011) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण मंजुरीचे महत्त्व अधोरेखित केले होते आणि म्हटले होते की पर्यावरणीय मंजुरीशिवाय कोणतेही काम सुरू करणे अवैध आहे. तसेच, Common Cause विरुद्ध Union of India (2017) या प्रकरणातही न्यायालयाने खाणकाम उद्योगाशी संबंधित अवैध कामांवर कठोर भूमिका घेतली होती आणि पर्यावरणाच्या नियमांचे पालन करण्यावर भर दिला होता. याच मालिकेत, Alembic Pharmaceuticals Ltd. विरुद्ध Rohit Prajapati (2020) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'पूर्वलक्षी पर्यावरणीय मंजुरी' देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला स्पष्टपणे चुकीचे ठरवले होते. न्यायालयाने म्हटले होते की, जर एखाद्या प्रकल्पाने पर्यावरणीय मंजुरीशिवाय काम सुरू केले असेल, तर त्याला नंतर 'नियमित' करता येणार नाही. अशा कृतींना प्रोत्साहन देणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना बक्षीस देण्यासारखे होईल. यासर्व पूर्वीच्या निकालांचा आधार घेतच, सध्याच्या प्रकरणातही सर्वोच्च न्यायालयाने 'पूर्वलक्षी हरित मंजुरी' देण्याचा केंद्र सरकारचा आदेश रद्द केला आहे. यातून न्यायव्यवस्थेची पर्यावरणाच्या संरक्षणाविषयीची कटिबद्धता स्पष्ट होते.

**या निर्णयाचे परिणाम काय असतील ?**

या निर्णयामुळे भविष्यात कोणताही प्रकल्प पर्यावरणीय मंजुरीशिवाय सुरू करणे अत्यंत कठीण होईल. प्रकल्पांना काम सुरू करण्यापूर्वीच सर्व नियम आणि अटींचे पालन करणे बंधनकारक होईल. यामुळे पर्यावरणाची हानी मोठ्या प्रमाणावर रोखता येईल आणि जबाबदार विकासाला चालना मिळेल. हा निर्णय पर्यावरणप्रेमी आणि पर्यावरण संरक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थांसाठी एक मोठा विजय आहे. न्यायालयाने केवळ कायद्याचे राज्यच नव्हे, तर आपल्या संविधानाने दिलेल्या स्वच्छ पर्यावरणाच्या अधिकाराचेही रक्षण केले आहे. आता केंद्र सरकारला अशा कोणत्याही अधिसूचना किंवा आदेश जारी करण्यास मनाई करण्यात आली आहे, ज्यामुळे भविष्यात 'पूर्वलक्षी हरित मंजुरी' दिली जाईल. यापुढे, सर्व उद्योजक आणि विकासकांना हे लक्षात ठेवावे लागेल की, विकासासोबत पर्यावरणाची काळजी घेणे ही त्यांची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयातून एक स्पष्ट संदेश मिळाला आहे- पर्यावरणाच्या संरक्षणाशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. ■ ■

# निषेधाच्या पलिकडे - अन्याय संपवण्यासाठी कृती हवी!

*अनेक दशकांपासून भारतात सामाजिक विषमता, जातीअत्याचार आणि विषमतेवर आधारित हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. आपण वारंवार 'जाहीर निषेध' करतो, संताप व्यक्त करतो, सोशल मीडियावर पोस्ट लिहितो, पण परिस्थिती फारशी बदलत नाही.*

नुकतीच भोर तालुक्यात एका बौद्ध तरुणाची हत्या झाली, कारण त्याने सवर्ण मुलीशी विवाह केला होता. यापूर्वी सोमनाथ सूर्यवंशीच्या हत्येचा देखील न्याय मिळालेला नाही. हे केवळ व्यक्तीगत गुन्हे नाहीत, तर जातीय मानसिकतेने ग्रासलेले गुन्हे आहेत, ज्यामुळे संपूर्ण समाज पिचत आहे.

निषेध किती वेळा करावा?

निषेध करणे हे अन्यायाविरोधातील पहिले पाऊल असते, पण ते पुरेसे नाही. किती वेळा निषेध करायचा?

प्रत्येक वेळी जेव्हा एखाद्याचे जीवन केवळ त्याच्या जातीमुळे हिरावले जाते, प्रत्येक वेळी जेव्हा प्रेमाच्या अधिकारावर जातीयवादाचे ग्रहण लागते आणि प्रत्येक वेळी जेव्हा संविधानाने दिलेले हक्क पायदळी तुडवले जातात, तेव्हा निषेध करणे आवश्यकच असते.



प्रवीण गांगुर्डे
मनसोपचारतज्ञ

पण केवळ निषेध करून आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. निषेध आता निरर्थक वाटू लागला आहे, कारण तो केवळ तात्पुरता संताप व्यक्त करणारा आवाज ठरतो आहे. आपण निषेधाच्या पुढे जाऊन मूलभूत बदलांसाठी संघर्ष करणार आहोत का? हा खरा प्रश्न आहे. म्हणून आज रस्त्यावर अन्यायाविरोधात मोर्चे काढून, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.



कायदयाच्या लढाईत पीडित कुटुंबांना न्याय मिळावा यासाठी सामाजिक चळवळींना न्यायालयीन लढतीत मदत करावी लागेल. शिक्षण व्यवस्थेत जातीय मानसिकता बदलण्यासाठी शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये समतेच्या मूल्यांची शिकवण दिली पाहिजे. माध्यमांमध्ये मुख्य प्रवाहातील माध्यमे अशा घटनांकडे दुर्लक्ष करतात. म्हणूनच सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून या घटनांची दखल घेतली पाहिजे.

'निषेध' या शब्दाला लाज वाटावी अशी परिस्थिती का निर्माण झाली?

कारण निषेध केवळ एका ठराविक घटनांपुरता उरतो. आपल्याला हे मान्य करावे लागेल की केवळ निषेध करून काहीही बदलत नाही. जोपर्यंत या गुन्ह्यांना सामाजिक आणि कायदेशीर पातळीवर कठोर शिक्षा मिळत नाही, तोपर्यंत अशी प्रकरणे घडतच राहतील.

समस्या कश्या सुटतील?

**1) कायद्याची कठोर अंमलबजावणी** –

आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी संरक्षण, आरोपींना त्वरित शिक्षा आणि पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्याची हमी सरकारने घ्यावी.

**2)सामाजिक परिवर्तन** –

जातीव्यवस्थेच्या विषमतेविरुद्ध व्यापक सामाजिक चळवळ उभी करणे आवश्यक आहे.

**3) संविधान जागरूकता** –

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समतेच्या तत्त्वांची शिकवण प्रत्येक स्तरावर पोहोचवणे गरजेचे आहे.

**4)राजकीय इच्छाशक्ती** –

केवळ राजकीय फायद्यासाठी समाजातील विषमता आणि द्वेषाला खतपाणी घालणाऱ्या प्रवृत्तींना विरोध केला पाहिजे.

'निषेध' आता फक्त शब्द म्हणून वापरण्याची वेळ संपली आहे. आज वेळ आहे कृतीची अन्यायाविरोधात लढण्याची, सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची आणि जातीय विषमता कायमची संपवण्याची! आपण यासाठी सज्ज आहोत का? ■ ■

RNI NO. MAHMAR/2020/84035

विनम्र अभिवादन



रमाबाई भीमराव आंबेडकर

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

मंगळवार, २७ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १४९ | दैनिक | किंमत : ₹५/-
Tuesday, 27 May 2025 | Year : 5 | Issue : 149 | Daily | Rate: Rs. 5/-

## आप आणि भाजपमध्ये झुंपली...

# मुसळधार पावसाने राजधानी तुंबली





**दिल्ली :** शनिवारी रात्री दिल्लीत झालेल्या पावसानंतर दिल्लीतील अनेक भागात पाणी साचले होते, त्यामुळे रविवारी सकाळी दिल्लीची दयनीय अवस्था झाली होती त्यामुळेच दिल्लीत पाणी तुंबण्याच्या विषयावरून आता राजकारण सुरू झाले आहे. राजधानीत जरी हा मान्सूनपूर्व पाऊस असला तरी, यामध्येच दिल्लीतील अनेक भाग पाण्यात बुडालेले दिसल्यामुळे विरोधी पक्षांनी सत्ताधारी भारतीय राजकारण सुरू झाले आहे. राजधानीत जरी हा मान्सूनपूर्व पाऊस असला तरी, यामध्येच दिल्लीतील अनेक भाग पाण्यात बुडालेले दिसल्यामुळे विरोधी पक्षांनी सत्ताधारी भारतीय जनता पार्टीची कोंडी करण्यास सुरूवात केली आहे.

दिवसभर सोशल मीडियावर आम आदमी पक्षाच्या नेत्यांच्या पोस्ट येत होत्या. यात दिल्लीतील वेगवेगळ्या भागातील फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करून पाणी साचण्यासाठी दिल्लीच्या भाजप सरकारला जबाबदार धरण्यात आले. तर दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनीही विरोधकांच्या आरोपांना तेवढेच जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरूवात केली.

वीरेंद्र सचदेवा म्हणाले आहेत की दरवर्षी दिल्लीत पावसाळ्यात अचानक वादळ आणि पाणी साचण्याच्या घटना घडत असत, परंतु गेल्या वर्षीपर्यंत तत्कालीन सरकारच्या दुर्लक्षामुळे अशा दिवशी दिल्लीची दुर्दशा पाहण्यासारखी होती, परंतु आज तीच परिस्थिती बरीच सुधारली आहे. सचदेवा म्हणाले आहेत की, रविवारी सकाळी दिल्लीतील लोक जागे झाले तेव्हा काल रात्री उशिरा आलेल्या वादळामुळे दिल्लीत अनेक ठिकाणी झाडे पडणे आणि पाणी साचणे इत्यादी तक्रारी आल्या. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या सूचनेनुसार, भाजपचे सर्व आमदार आणि नगरसेवक, जल मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी रविवार असूनही रस्त्यावर उतरले आणि सकाळी 9 वाजेपर्यंत दिल्लीतील वाहतूक सुरळीत झाली आणि दुपारी 12 वाजेपर्यंत परिस्थिती सामान्य झाली.

दिल्लीतील मागील केजरीवाल सरकारवर निशाणा साधताना सचदेवा म्हणाले की, केजरीवाल सरकार पाणी साचल्याबद्दल उपराज्यपाल आणि अधिकाऱ्यांना दोष देत असे आणि दिल्लीतील लोकांना नशिबाच्या दयेवर सोडत असे, तर सध्याचे भाजप सरकार ही जबाबदारी स्वतःवर घेते आणि अचानक वादळ आणि पावसानंतर परिस्थिती सामान्य करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपली ताकद बनवते.

## नॅशनल कॉन्फरन्समध्ये फूट



**श्रीनगर :** नॅशनल कॉन्फरन्समध्ये मोठे मतभेद झाल्याने काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि पक्षाचे खासदार आगा रुहुल्ला मेहदी यांच्यातला वाद आता समोर आला आहे. याबाबत सारवासारव करीत डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न करताना पक्षाने असा दावा केला आहे की, पक्षाची बैठक अगदी शांतपणे कोणताही वाद न होता पार पडली आणि मेहदी हे अचानक बैठकीतून निघून गेलेले नाहीत. श्रीनगरचे खासदार काही दिवसांपासून विविध मुद्द्यांवरून नॅशनल कॉन्फरन्सच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत. मात्र, शनिवारी झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांनी पक्षाच्या वैचारिक भूमिकेपासून दूर राहणे पसंत केले आणि निवडणूक जाहीरनाम्यात लोकांना दिलेल्या आश्वासनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नॅशनल कॉन्फरन्सच्या सूत्रांनी सांगितल्याप्रमाणे, मेहदी यांनी मुख्यमंत्र्यांसह पक्षाच्या नेत्यांना प्रश्न विचारले आहेत. अब्दुल्ला यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करीत जाहीरनाम्यात दिलेली मुख्य आश्वासनं ते विसरले आहेत, अशी टीका त्यांनी केली होती. विशेष दर्जा पुनर्संचयित करणे आणि जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा परत मिळवून देणे अशा आश्वासनांचाही त्यात समावेश आहे.

## अजनीचे 'लोको कॅब मॉडिफिकेशन' देशात दुसऱ्यास्थानी



**नागपूर :** रेल्वेच्या सर्वोत्तम लोको कॅब मॉडिफिकेशन स्पर्धेत अजनी लोको शेडला राष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. हा राष्ट्रीय सन्मान अजनी लोको शेडला कानपूर सेंट्रल आणि विशाखापट्टनम वाल्टेयर सोबत मिळाला.

बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स येथे राष्ट्रीय स्तरावरची सर्वोत्तम लोको कॅब मॉडिफिकेशन स्पर्धा पार पडली. भारतीय रेल्वेतील नवनवीन उपक्रम, सुधारणा आणि चालकांसाठी निर्माण करण्यात आलेल्या सुविधा आदी मुद्द्यांवर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्यात अजनीच्या ईलेक्ट्रीक लोको कॅबमध्ये (लोको क्र. 33330/ डब्ल्यूएजी-9 एचसी) उच्च हॉर्सपॉवर असलेल्या ब्रॉड गेज एसी मालवाहू इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हमध्ये भर देण्यात आला. या लोको कॅबमध्ये लोकोचे सुशोभिकरण आणि वेगवेगळ्या अद्ययावत सुधारणा करण्यात आल्या. त्यात नवीन रंगकाम, उन्नत पॅनेलिंग, नव्याने डिझाइन केलेला डॅशबोर्ड, आणि उष्णतारोधक फॅब्रिक हेडलाइनरचा समावेश आहे. फोल्डेबल परदे, रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह बँड्स, एलईडी लायटिंग आणि ऑटोमॅटिक परफ्युम डिस्पेन्सर ही आणखी काही येथील वैशिष्ट्ये आहेत.

या सोबतच संचालन कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांचा रशियावर भडका?

**नवी दिल्ली :** रशिया-युक्रेनमधील संघर्ष थांबवण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी देखील करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्या मध्यस्थीला अद्याप यश आलेले नाही. हवाई हल्ल्यात युक्रेनच्या 13 जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण गंभीर जखमी झाले. रशियाने युक्रेनियन शहरांवर तब्बल 367 ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागल्याची माहिती सांगितली जाते. रशियाने युक्रेनवर हवाई हल्ला केल्यानंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी रशियाच्या विरोधात कडक निर्बंध लादण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया दिली असून ते रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावर चांगलेच भडकल्याचे पाहायला मिळाले आहे.

## प्रधानमंत्री मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर



**गांधीनगर :** भारतीय सैन्यदलातील कर्नल सोफिया कुरेशी हे नाव आता संपूर्ण भारताला परिचित झाले आहे. आता त्यांचे कुटुंबियही चर्चेत आहेत. पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून आज वडोदरा येथे त्यांचा रोड शो झाला. यावेळी कर्नल सोफिया कुरेशी यांच्या कुटुंबाने त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. सोफिया कुरेशी यांचे वडील ताज मोहम्मद, आई हलिमा कुरेशी यांनी पंतप्रधान मोदींच्या रोड शो दरम्यान हजेरी लावली. ऑपरेशन सिंदूरला मिळालेल्या यशानंतर प्रधानमंत्रींना शुभेच्छा देण्यासाठी या रोड शोचे आयोजन करण्यात आले होते. रोड शोनंतर कर्नल सोफिया कुरेशी यांनी एएनआयशी बोलतांना सांगितले, प्रधानमंत्री मोदींना भेटून आम्हाला आनंद झाला. त्यांनी महिला सशक्तीकरणासाठी खूप काम केले आहे. मी स्वतः एक महिला आहे आणि मला याचा आनंद वाटतो की, प्रधानमंत्रींनी महिलांना पुढे आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. सोफिया माझी जुळी बहीण आहे. ती माझ्यापेक्षा 15 मिनिटांनी मोठी आहे. तिने देशासाठी खूप चांगले काम केले असून ती अनेकांसाठी आता प्रेरणा बनली असून ती माझीच नाही तर देशाची बहीण झाली आहे.

## बांगलादेशची स्थिती बिकट



**नवी दिल्ली :** बांगलादेशची आर्थिक व सामाजिक स्थिती दिवसेंदिवस खालावते. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या धोरणांविरोधात सामान्य नागरिक व शासकीय कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत. राजधानी ढाक्याची स्थिती बिकट झाली आहे. ढाक्यात प्रामुख्याने आंदोलनं होत असल्याने सरकारची चिंता वाढली आहे. तिथल्या सरकारला मोठ्या उद्रेकाची भीती सतावतेय. दरम्यान, बांगलादेशमधील प्रमुख व्यावसायिक समुदायाचे नेते शौकत अझीज रसेल यांनी देखील देशाची आर्थिक स्थिती खराब असल्याची चिंता व्यक्त केली.रसेल म्हणाले, 1971 च्या मुक्ती युद्धावेळी देशात ज्या पद्धतीने बुद्धिजीवींना ठार मारण्यात आले होते, तसेच यावेळी देशातील व्यावसायिकांना मारले जात आहे. देशातील बेरोजगारी वाढली आहे. भीषण दुष्काळात एखादा देश संघर्ष करतो तशीच काहिशी स्थिती निर्माण झाली आहे.

## पहलगाममधील पीडित महिलांबाबत भाजपा खासदाराचे वादग्रस्त विधान



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांबाबत राज्यसभा खासदार रामचंद्र जांगडा यांनी वादग्रस्त विधान केले आहे. त्यांच्या विधानावरून काँग्रेसने रविवारी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला. पहलगाममध्ये प्राण गमावलेल्या पर्यटकांनी दहशतवाद्यांशी लढायला हवे होते. ज्या महिलांनी आपले पती गमावले; त्यांच्यात योद्ध्यासारखा उत्साह व जोश नव्हता म्हणूनच 26 लोक हल्ल्याचे बळी ठरले, असे वादग्रस्त विधान जांगडा यांनी केले.

हरयाणामधील भिवानी येथे अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जन्मोत्सवानिमित्ताने आयोजित एका कार्यक्रमात रामचंद्र जांगडा बोलताना म्हणाले, 'पहलगाम हल्ल्यामध्ये पती गमावलेल्या आमच्या बहिणींमध्ये लढा देण्याची वृत्ती, जिद्द व जोश नव्हता. त्यामुळे त्या बळी ठरल्या. हात जोडून विनंती करणाऱ्यांना दहशतवादी सोडत नाहीत. आपली माणसे हात जोडून मरण पावली', असे ते म्हणाले.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी रामचंद्र जांगडा यांच्या व्यक्तव्याचा निषेध करत 'एक्स'वर एका पोस्टमध्ये म्हटले, 'भाजपाचे राज्यसभा खासदार रामचंद्र जांगडा यांच्या लज्जास्पद विधानाने पुन्हा एकदा संघ-भाजपाची क्षुद्र मानसिकता उघडकीस आणली आहे. मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी आपल्या शूर सैन्याचा अपमान केला; परंतु प्रधानमंत्री मोदींनी कोणतीही कारवाई केली नाही. मध्य प्रदेशचे मंत्री विजय शाह यांनी आपल्या शूर कर्नलवर अश्लील टिप्पणी केली; परंतु त्यांना आजपर्यंत बडतर्फ करण्यात आलेले नाही' खरगे यांनी पुढे म्हटले. पहलगाममध्ये मारल्या गेलेल्या नौदल अधिकाऱ्याच्या पत्नीला सोशल मीडियावर ट्रोल केले जात असतानाही मोदीजी गप्प होते. नरेंद्र मोदीजी तुम्ही म्हणता की, तुमच्या नसांमध्ये सिंदूर आहे. जर तसे असेल, तर महिलांच्या सन्मानासाठी तुम्ही तुमच्या या वाईट बोलणाऱ्या नेत्यांची पक्षातून हकालपट्टी करावी,' असे ते पुढे म्हणाले.

## एआयएमआयएम इंडिया आघाडीत सामील होण्यास उत्सुक?



**पाटणा :** असदुद्दीन ओवेसी यांच्या नेतृत्वाखालील ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) यावर्षी अरजेडीच्या नेतृत्वाखालील महाआघाडीत सामील होण्याचा विचार करत आहे. यावर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी ही युती होण्याची चिन्हे आहेत. लालू प्रसाद आणि तेजस्वी प्रसाद यादव यांच्या नेतृत्वाखालील आरजेडी व्यतिरिक्त विरोधी इंडिया आघाडीत काँग्रेस आणि डावे पक्ष आहेत.

बिहारमधील एआयएमआयएम नेते आरजेडी नेत्यांच्या संपर्कात आहेत. 'आम्ही महाआघाडीसोबत युती करण्यास उत्सुक आहोत. आम्ही याबाबत खूप सकारात्मक आहोत. आमची विचारसरणी भाजपाला पराभूत करणे आणि बिहारला सक्षम करणे हीच आहे. भाजपासोबतची आमची लढाई काँग्रेससारखीच आहे. महाआघाडीने एआयएमआयएमला सोबत घ्यावे अशी आमची इच्छा आहे', असे एआयएमआयएमचे राष्ट्रीय प्रवक्ते आदिल हसन यांनी सांगितले.

आगामी बिहार निवडणुकीत एआयएमआयएमने 243 पैकी 50 हून अधिक विधानसभा जागा लढवण्याची योजना आखली आहे. असे असूनही पक्ष आपल्या जागा निवडण्याबाबत परिवर्तनशील आहे. जर आरजेडी आणि काँग्रेसने त्यांना सामावून घेण्यास सहमती दर्शविली तर कमी जागा लढवण्याचीही तयारी आहे, असे पक्षाच्या सूत्रांनी सांगितले.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी प्रकरणी सीआरपीएफ जवानाला अटक



**चंदिगढ :** पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी काही दिवसांपूर्वी हरियाणामधून सहा जणांना अटक करण्यात आली. यामध्ये यूट्यूबर ज्योती मल्होत्रा हिचा देखील समावेश होता. या प्रकरणानंतर संपूर्ण देशात मोठी खळबळ उडाली होती.ज्योती मल्होत्रा प्रकरणात आता अनेक खुलासे समोर येत आहेत. यानंतर आता पाकिस्तानला गोपनीय माहिती शेअर केल्याप्रकरणी एका सीआरपीएफ जवानाला अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) ही कारवाई केली आहे. या घटनेबाबत राष्ट्रीय तपास संस्थेने सोमवारी सांगितले की, केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) एका जवानाने पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांना संवेदनशील माहिती शेअर केल्याच्या आरोपाखाली सीआरपीएफ जवानाला दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित गोपनीय माहिती या जवानाने पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप करण्यात आला आहे.



# संविधान डिबेट वाचनाचा विश्वविक्रम!

## संविधानाची 75 वर्ष, 75 तास, 75 अनुच्छेदावर 125 व्यक्तींची चर्चा

**नागपूर :** भारतीय संविधानाला 75 वर्षे पूर्ण झाल्याने त्याच्या हीरक महोत्सवा निमित्त संविधानातील 75 अनुच्छेदावर, 75 तास व 75 प्लस व्यक्तींच्या चर्चाचे आयोजन 23 मे ते 26 मे च्या दरम्यान नागपुरातील प्रसिद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्वेंशन सेंटरमध्ये करण्यात आले होते. आज या ऐतिहासिक कार्यक्रमाचा समारोप प्रसिद्ध आंबेडकरी व संविधानाचे गाढे अभ्यासक प्रा. देविदास घोडेस्वार यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनात मोठ्या जल्लोषात करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक न्याय विभाग, बार्टी प्रशासन व दिशा ह्यूमन वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. 75 व्यक्तींचे टारगेट असले तरी 125 व्यक्तींनी वाचनात सहभाग घेतला त्यामुळे एकेक अनुच्छेद दोन दोन व्यक्तींना वाचावा लागला हे विशेष.

भारतीय संविधानाच्या निर्मिती मागील वाद विवादावर व त्याच्या अनुच्छेदावर सलग 75 तास चर्चेचा देशातील हा प्रथमच कार्यक्रम होता. त्यामुळे या ऐतिहासिक कार्यक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड ने सुद्धा नोंद घेण्यासाठी त्यांचे द्रह्ह्द्ध जज असलेले मनीष पाटील यांना प्रामुख्याने पाठवले होते. या ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी शहरातील विविध संस्था, संघटना चे प्रतिनिधी, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित झाले होते.

भारतीय संविधान बनविताना 2 वर्ष 11 महिने व 18 दिवसाचा कालावधी लागला. त्या दरम्यान झालेल्या चर्चेचे केंद्र सरकारने इंग्रजी व हिंदीत कॉन्स्टिट्यूट असेंबली डिबेट्स प्रकाशित केले. त्या डिबेट्स चे मराठीत भाषांतर प्रा देविदास घोडेस्वार यांनी केले. या तिन्ही भाषेतील अनुच्छेदाच्या वादविवादाचे वाचन याप्रसंगी करण्यात आले. या वाचनाच्या उपक्रमात बारा वर्षाच्या विद्यार्थ्यापासून तर सत्तर वर्षाच्या वयोवृद्धा पर्यंतच्या व्यक्तींचा समावेश होता. तसेच वाचन मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत करण्यात आले. यात वकील, कॉलेज व अभ्यासिकेतील विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

प्रा. देविदास घोडेस्वार यांनी राज्य व केंद्र शासनाच्या उदासीन धोरणाचा याप्रसंगी खरपूस समाचार घेतला. एवढेच नव्हे तर यांच्यापासूनच संविधानाला धोका असल्याने सर्वसामान्यांनी सामान्यांचे कवच कुंडल असलेल्या संविधानाच्या रक्षणासाठी प्रत्येक सामान्यांनीच पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. एवढेच नव्हे तर संविधानाच्या मूळ प्रास्ताविकेत सुद्धा शासनकर्त्या तर्फे फेरफार व चुका करण्यात आल्याचे सुद्धा त्यांनी सांगितले.

याप्रसंगी नागरिकांच्या वतीने उत्स्फूर्तपणे संविधान तज्ञ प्रा. देविदास घोडेस्वार व कार्यक्रमाचे मुख्य आयोजक वामन सोमवार व त्यांचे सहकारी यांचे अभिनंदन करण्यात आले.

वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा मंगलकामना



सी.एम. चव्हान




: शुभेच्छुक :
संचालक : वात्सल्य छाया फाऊंडेशन
विमल चंद्रभान चव्हान,
स्मिता मनिष महाजन,
डॉ. स्वाती नितीन दारुंडे,
डॉ. स्मृती विशाल सोरटे,
अद्विका, आभा, वत्सल, विहान,
दैनिक बहुजन सौरभ परिवार.